# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/12/2021 (मंगळवार)

---

## घरफोडी

1) पो.स्टे. बुटीबोरीः– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील प्लॉट नं. 74 दांडेकर ले आउट वार्ड कं. 2 बुटीबोरी येथे दिनांक 06/12/2021 चे 08.30 वा. ते चे 15.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अजय रघुनाथ देशकर वय 41 वर्ष, रा. प्लॉट नं. 74 दांडेकर ले आउट वार्ड कं. 2 बुटीबोरी व त्यांची पत्नी दोघेही सकाळी डयुटीवर गेले होते व मुलगा सुध्दा शाळेत गेला होता. दुपारी मुलगा शाळेतून परत आला व त्याने लॉक उघडुन आत प्रवेश केले असता त्यास घरचे सामान अस्तव्यस्त पडलेले दिसले. तसेच त्याने फिर्यादीस फोन केला तर फिर्यादी हे घरी आले व पाहिले असता बेडरुम मधील आलमारी उघडी होती व लॉकर सुध्दा उघडे होते. लॉकर मध्ये स्टीलचा डब्यात लग्नाचे वेळेचे सोन्या–चांदीचे दागीने किं. 48,000/–रु. व 2 मोबाईल किं. 8,000/–रु. असा एकुण कि. 56,000/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने किचन खोलीचा दरवाजाचा कडीकोंडा तोडून घरात प्रवेश करुन चोरी केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुटीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि श्रीमती आरती उघडे मो.कं. 8355947473 या करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत काटोल टाउन येथे दिनांक 05/12/2021 चे 11.00 वा. ते दिनांक 06/12/2021 चे 08.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिलीप संतोशराव धकीते, वय 52 वर्ष, रा. हनुमान नगर, काटोल हे नागपुर येथे मुलीकडे गेले होते. त्यांना दि 06/12/21 रोजी सकाळी 08.00 शेजारी राहणारा प्रमोद गायधने याने फोन करून सांगीतले की, ''तुमच्या घराचा दरवाजा अर्धवट उघडा दिसत आहे'' यावरून फिर्यादी हे पत्नीसह नागपुर वरून काटोल येथे घरी परत येवुन पाहले असता घराचा कोंडा वाकलेला दिसला व लोंखडी कपाट व लॉकर उघडे दिसले. लोखंडी कपाटातुन नगदी अंदाजे 8,000/–रू, 10 सोन्याचे बारीक मणी अंदाजे 1,000/–रू. असा एकुण कि. 9,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हाण हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 14 कि.मी अंतरावरील कांद्री आरटीओ चेक पोस्ट येथे दिनांक 06/12/2021 चे 03.00 वा. ते 03.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मयुर रमेश ठाकरे, वय 31 वर्ष, रा. वळंबा हा जबलपुर नागपुर हायवे रोडवरील कांद्री चेकपोस्ट येथे स्वताचे मालकीचे 14 चाकी ट्रक क्रमांक एमएच– 40/सीडी– 2786 नी नागपुर कडे जाण्यास ट्रक क्लिीनर सह थांबला होता. फिर्यादीचे 14 चक्का ट्रकचे मागे लाईनमध्ये असलेले आयसर ट्रकचा चालक आरोपी क्र. 1) हिमांशु सतीश प्रजापती वय 20 वर्ष, रा. मनसर याने त्याची गाडी ओव्हरटेक करण्याचे कारणावरून फिर्यादीस भांडण केले. तेथे हजर असलेला एमएच– 40/सीए– 1773 क्रमांकाच्या स्विफ्ट कारचा चालक आरोपी क्र. 2) रिजवान ईब्राहीम खान वय 33 वर्षे रा. मनसर याने व आरोपी 1. आयसर चालकाने त्यांचे कडील ट्रकचे टायर काढण्याचे लोखंडी रॉडने फिर्यादीला मारून जखमी केले. फिर्यादीचे डावे कानाला, तसेच उजवे पायाचे पोटरीवर मारून जखमी केले आहे. तसेच त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 326, 324, 504, 506, 34 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि निशा भुते मो. नं. 9822566180 या करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत मौजा टाकळघाट रोड हनुमान मंदिर जवळ येथे दिनांक 04/12/2021 चे 12:00 वा. दरम्यान राष्ट्रपाल रामटेके (मृतक), वय 50 वर्ष, रा. रेंगेपार ता. लाखनी जि. भंडारा ह.मु. वैशाली नगर टाकळघाट याने आपली एमएच–36/एएच– 0431 क्रमांकाच्या मोटरसायकलने टाकळघाट वरून आपले घरी भरधाव वेगाने जात असता हनुमान मंदिर टाकळघाट जवळ त्याची मोटरसायकल स्लिप झाली. या अपघातात मोटरसायकलसह खाली पडल्याने तो गंभीर जखमी झाला व स्वताचे मृत्युस कारणीभुत ठरला. त्याला उपचारकामी पीएचसी टाकळघाट येथे नेले तेथुन मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर केल्याने त्याला डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ नमिता राष्ट्रपाल रामटेके वय 50 वर्ष रा. रेंगेपार ता लाखनी जि भंडारा ह.मु वैशाली नगर टाकळघाट यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार बन्सोड मो नं. 9673608642 हे करीत आहे.

2) पो.स्टे. पारशिवनी :– दिनांक 06/12/2021 चे 12:00 वा. ते 12.30 वा. दरम्यान एम.एच–40/एन–5134 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे– केशव हरिभाउ शिवारे, वय 31 वर्ष, रा. चांदनी चौक, सिल्लेचाडा याने आपले ताब्यातील वाहन खापरखेडा ते पारशिवनी रोडवरील मौजा तामसवाडी शिवारातील तामसवाडी फाटा ते इटगाव च्या मधात लहान नहर जवळ भरधाव वेगाने हयगईने व निष्काळजीपणे चालवून समोरून येणाऱ्या एम.एच–40/ए.बी–5750 क्रमांकाच्या होंन्डा डियो मोपेडला धडक दिली. तसेच ट्रक समोर चालणाऱ्या एम.एच.–40/एच–6461 क्रमांकाचा हिरो होंन्डा मोटरसायकला आरोपीने मागुन धडक देवून दोन्ही वाहनावर बसलेल्या इसमांना जखमी करून ट्रक पलटी करून ट्रक खाली ट्रक कंडक्टर घनश्याम पतीराम वरखडे वय 32 वर्ष, रा. सिल्लेवाडा याचा दबुन जागीच मृत्यु झाला. तर होंन्डा डियो मोपेड मधील चालक कुदंन घोडेंगे व कवडु घोडेंगे तसेच होंन्डा मोटरसायकल चालक देवीदास गौरखेडे हे जखमी असून त्यांचा उपचार सुरु आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राष्ट्रपाल बाबुराव पाटील वय 48 रा. वार्ड क्र.2 डोरली ता. पारशिवनी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दिलीप बासोडे मो.न. 9823083905 हे करीत आहे

# गळफास लावून मृत्यु

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत हरीहर नगर कन्हान येथे दिनांक 06/12/2021 ते 16.15 वा. सुमारास अक्षय धनराज सोनवने (मृतक) वय 24 रा. हरीहर नगर कन्हान याने त्याच्या बहीणीच्या वाढदिवसाला गिफ्ट नेउन दिले आणी घरी येउन फिर्यादीस म्हटले की, 'आपल्याला भाचाचे वाढदिवसाला जायचे आहे' तेव्हा जाण्यास नकार दिला. त्याचा राग मनात धरून त्याने त्याच्या राहते घरी स्पॅच्या हूकला दोरीने बांधून गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ पंचफूला धनराज सोनवने वय 48 रा हरीहर नगर कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार खुशाल रामटेक मो.नं. 8485861442 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील धापेवाडा विठ्ठल रुक्मीनी मंदीर जवळ ता. कळमेश्वर येथे दिनांक 06/12/2021 चे 14.00 वा. सुमारास सागर बाबा उताने (मृतक), वय 23 वर्ष रा .धापेवाडा विठ्ठल रुक्मीनी मंदीर जवळ ता. कळमेश्वर याने अज्ञात कारणातुन आपले राहते घरी शौचालय–बाथरुमचे वरच्या पॅराफिटटला असलेल्या लोखंडी पाईपला दुपट्टाबांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला. त्यास उपचाराकामी सरकारी दवाखाना धापेवाडा येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बबा केशवराव उताने वय 50 वर्ष, रा. धापेवाडा विठ्ठल रुक्मीनी मंदीर जवळ ता. कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार पुष्पपाल आकरे मो. न 9823715795 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर